# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

## जनसंपर्क विभाग

कक्ष क्रमांक १९/२०, तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२ ६६४०५०६६ संकेतस्थळ : https://mhada.gov.in


=====================================================================================

जा.क्र.जसंवि/प्रसिद्धी पत्रक/१८७८ दि. १०/१२/२०२०

प्रसिद्धी पत्रक

# म्हाडा पुणे मंडळ सदनिका सोडत
# ५ हजार ६४७ सदनिकांच्या सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणीला प्रारंभ

'म्हाडा'ची प्रक्रिया पारदर्शक, कोणाच्याही फसवणुकीला बळी पडू नका - उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचे आवाहन

मुंबई, दि. १० डिसेंबर, २०२० : महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) माध्यमातून सर्वसामान्यांना माफक दरात हक्कांची घरे मिळवून देण्याचे काम सुरु आहे. लोकांच्या मनात विश्वास निर्माण केल्याने 'म्हाडा'च्या योजनांना मोठा प्रतिसाद मिळत आहे. म्हाडाच्या पुणे मंडळातर्फे ५ हजार ६४७ सदनिकांसाठी सोडत प्रक्रियेला आजपासून प्रारंभ होत असून ही प्रक्रिया अत्यंत पारदर्शक असून या कामासाठी कोणाही मध्यस्थाची नेमणूक करण्यात आलेली नाही, त्यामुळे सर्वसामान्यांनी कोणाच्याही फसवणुकीला बळी न पडता पुणे मंडळाने घोषित केलेल्या सोडतीत ऑनलाईन प्रक्रियेद्वारे सहभाग घ्यावा, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी आज केले.

मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती सभागृहात आज उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्या हस्ते पुणे मंडळाच्या विविध गृहनिर्माण योजनेतील ५ हजार ६४७ सदनिकांसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी व अर्ज सादर करणे या प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड, गृहनिर्माण राज्यमंत्री श्री. सतेज पाटील, गृहनिर्माण विभागाचे प्रधान सचिव श्री. एस. व्ही. आर. श्रीनिवास उपस्थित होते.

श्री. पवार यांनी सांगितले कि म्हाडा ही सर्वसामानांच्या जिव्हाळ्याची संस्था असून पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अखत्यारीतील पुणे, कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यातील ५ हजार ६४७ सदनिका व राधानगरी (कोल्हापूर) येथील ६८ भूखंड अत्यंत माफक किमतीत उपलब्ध होणार आहेत. राज्य शासन सर्वांना हक्काचा निवारा मिळवून देण्यास कटिबद्ध असून याद्दष्टीने शहरी व ग्रामीण भागात विविध गृह योजनांची अंमलबजावणी सुरु आहे, असेही ते म्हणाले . त्याचबरोबर राज्यातील सर्व शहरे झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी राज्य सरकारकडून विशेष प्रयत्न सुरु असून त्यासाठी झोपडपट्टी पुनर्विकास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे, अशी माहिती त्यांनी या प्रसंगी दिली.

'कोरोना'च्या संकटामुळे राज्याची विस्कटलेली आर्थिक घडी पुन्हा बसविण्यासाठी राज्य सरकारने मुद्रांक शुल्कात मोठी सवलत देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा चांगला परिणाम दिसत असून घरांच्या खरेदी-विक्रीत वाढ झाली आहे. सर्वसामान्यांच्या स्वप्नातील घरे मिळवून देण्यासाठी 'म्हाडा'च्या माध्यमातून काम सुरु आहे. यापुढेही 'म्हाडा'ने सर्वसामान्यांना परवडतील अशी पर्यावरणपूरक घरे निर्माण करावीत. त्यासाठी विविध प्रकल्प हाती घ्यावेत. 'म्हाडा'च्या योजनांच्या माध्यमातून दर्जेदार व माफक किंमतीत घरे मिळण्यासाठी अधिकाधिक लोकांनी या योजनेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. पवार यांनी केले.

यावेळी उपमुख्यमंत्री श्री. पवार व गृहनिर्माण मंत्री डॉ. जितेंद्र आव्हाड यांच्या हस्ते सदनिका सोडतीसंदर्भातील माहिती पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. प्रास्ताविक 'म्हाडा'च्या पुणे मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. नितीन माने यांनी केले. तर मंडळाचे मिळकत व्यवस्थापक श्री. विजय ठाकूर यांनी आभार प्रदर्शन केले.

**सोडतीत विविध उत्पन्न गटातील सदनिका**

प्रधानमंत्री आवास योजनेतून पुणे जिल्हयात म्हाळूंगे (चाकण) येथे ५१४, तळेगांव दाभाडे येथे २९६, सोलापूर जिल्हयात गट नं. २३८/१, २३९ करमाळा येथे ७७ तर सांगली येथे स.क्र.२१५/३ येथे ७४ सदनिका अशा एकूण ९६१ सदनिकांसाठी अर्ज भरता येतील. तर म्हाडा अंतर्गत पुणे येथील मोरवाडी पिंपरी येथे ८७, पिंपरी वाघेरे येथे ९९२ अशा एकूण १०७९ सदनिका आहेत. तसेच सांगली येथे १२९ सदनिका आहेत.

प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या योजतेंतर्गत पुणे जिल्हयात म्हाळुंगे येथे १८८०, दिवे येथे १४ तर सासवड येथे ४ सदनिका आहेत. तसेच सोलापूर जिल्हयात ८२ सदनिका आहेत, अशा एकूण १९८० सदनिका आहेत.

२० टक्के सर्व समावेशक गृहनिर्माण योजनेंतर्गत पुणे महानगरपालिका येथे ४१०, पिंपरी चिंचवड महानगरपालिका येथे १०२० तर कोल्हापूर महानगरपालिका येथे ६८ अशा एकूण १४९८ सदनिका आहेत. या सर्व सदनिका अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च उत्पन्न गटांसाठी उपलब्ध आहेत. तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी येथील ६८ भूखंड देखील या सोडतीत विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

**११ जानेवारी, २०२१ पर्यंत ऑनलाईन अर्ज नोंदणी**

दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी दुपारी ३ वाजेपासून ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात होणार असून नोंदणीकृत अर्जदार दिनांक १० डिसेंबर, २०२० रोजी सायंकाळी ६ वाजेपासून ऑनलाईन अर्ज भरू शकतील. तसेच ऑनलाईन अर्ज नोंदणी दिनांक ११ जानेवारी, २०२१ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत करता येणार आहे. दिनांक १२ जानेवारी, २०२१ रोजी रात्री ११.०० वाजेपर्यंत अर्जदारांना ऑनलाईन अर्ज सादर करता येणार आहेत. दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी रात्री ११.०० पर्यंत ऑनलाइन अनामत रक्कमेची स्वीकृती केली जाणार आहे. तसेच दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी संबंधित बँकांच्या कार्यालयीन वेळेपर्यंत RTGS / NEFT द्वारे अनामत रकमेचा भरणा अर्जदारांना करता येईल.

https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर सदनिका सोडतीबाबत माहिती पुस्तिका व अर्जाचा नमुना उपलब्ध राहील. दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजी प्राप्त अर्जाची सोडत कार्यक्रम पुणे मंडळाच्या गृहनिर्माण भवन, आगरकर नगर येथील कार्यालयात सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात येणार आहे.

सदनिकांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणालाही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये तसे केल्यास पुणे मंडळ कोणत्याही व्यवहारास / फसवणूकीस जबाबदार राहणार नाही, असे आवाहन म्हाडातर्फे करण्यात येत आहे.

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

========


महाराष्ट्र




उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र


उप मुख्यमंत्री
महाराष्ट्र